# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र.२२/२०१२-१३/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तानाजी बाजीराव शिंदे,<br>मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. तानाजी बाजीराव शिंदे, मु.पो. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ खापरे यांचेमार्फत अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी जत उप विभाग विरुध्द तक्रार दि. २५.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदाराने आपले घर क्र. ३९१ येथे विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. १५.११.२०११ रोजी वि.प.कडे अर्ज केला. वितरण वाहिनीचा विस्तार असलेने अर्जदारास १ महिन्यात चलन मिळणे आवश्यक होते, ते दि. २८.३.२०१२ रोजी मिळाले. अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १६.२.२०१२ रोजी तक्रार दाखल केली, परंतु अंतर्गत कक्षाने आजतागायत कोणतेही आदेश पारीत केले नाहीत. मंचाकडन अपेक्षित मदत - चलन मिळणेस झालेल्या विलंबापोटी कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३०.५.२०१२ च्या लेखी अहवालात तक्रारदार ग्राहकाचा घरगुती वीज जोडणीचा अर्ज दि.२४.११.२०११ ला प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. त्यांचे वीज कनेक्शनसाठी ०.२४ कि.मी. (लघुदाब वाहिनी १ फेज २ वायर ) इतका वाहिनी विस्तार लागत आहे, त्यासाठी अंदाजपत्रक मंजुरी दि.२१.१.२०१२ रोजी झाली आहे. अर्जदारास दि. २८.३.२०१२ ला चलन दिले आहे. सदर वीज कनेक्शन हे संख उप विभागामध्ये माडग्याळ शाखा कार्यालयांतर्गत येते. शाखा कार्यालयातील अपुरे कर्मचारी, थकबाकी वसुली, वीज चोरी पकडणे इ. अतिरिक्त कामामुळे चलन देण्यास विलंब झाला असे म्हटले आहे. सदरची तक्रार निकाली काढावी अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. २९.६.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी गैरहजर. वि.प.तर्फे श्री. एस.बी.पाटील, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. ग्राहकाला कोटेशन दिले आहे. अपुरे कर्मचारी, थकबाकी वसुली इ. कामांमुळे चलन देण्यास विलंब झाला आहे, तो माफ करावा, तक्रार निकाली काढावी अशी विनंती केली.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

अर्जदार ग्राहकाने दि. १५.११.२०११ ला वि.प.कडे वीज जोडणीसाठी अर्ज दिल्याचे आपल्या तक्रारीत म्हटले आहे, परंतु वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात अर्जदाराचा अर्ज दि. २४.११.२०११ ला प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. ग्राहकाने प्रासेसिंग फी भरल्याची पावती अर्जासोबत जोडली नाही. उभयबाजूंच्या कथनानुसार वितरण वाहिनी विस्तार आहे हे स्पष्ट होते. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार अर्जाच्या तारखेपासून १ महिन्यात चलन मिळणे आवश्यक होते, ते दि. २८.३.२०१२ ला दिले. अंदाजपत्रकास मंजुरी २ महिन्यांच्या विलंबाने म्हणजे दि. २१.१.२०१२ ला घेण्यात आली आहे, त्यामुळे चलन देण्यासही विलंब झाला आहे. वि.प.ने लेखी अहवालात शाखा कार्यालयातील अपुरे कर्मचारी, थकबाकी वसुली, वीज चोरी पकडणे इ. अतिरिक्त कामामुळे चलन देण्यास विलंब झाला अशी कारणे दिली आहेत.

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

वि.प.चे स्थानिक अधिकारी कृती मानके तरतुदीची पूर्तता करण्यात अपयशी ठरले आहेत. त्यामुळे ग्राहकास भरपाई मिळण्याचा हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. वि.प.ने लेखी अहवालात विलंबाबद्दल दिलेली कारणे ग्राह्य धरता येणार नाही. ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार विलंबापोटी भरपाई मंजूर करणे योग्य होईल. मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि.२५.१२.२०११ ते चलन दिलेली तारीख २८.३.२०१२ या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using SmartPDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com